# "वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती"

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
आयसीएसएसआर, पोस्ट डॉक्टोरल फेलो, समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, तथा
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

★★★

**प्रस्तावना :–** वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या हे जागतिक लोकसंख्येचे वौशिष्टयो आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी वृध्दांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या वृध्दांच्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. "एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे."[1] म्हणजेच या शतकात वृध्दांच्या लोकसंख्येत मोठ्याा प्रमाणात वाढ होणार आहे. "संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणीनुसार भारतात इ.स. 2025 साली ज्येष्ठ लोकांची संख्या 17 कोटी 74 लाख होईल. ही संख्या जगातील ज्येष्ठ लोकांच्या 15 टक्के इतकी असेल. आता जगातील 60 टक्के ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशात राहतात." लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला जसा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो, अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखिल सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील वृध्दांचे वाढते प्रमाण हे एक महत्वाचे आव्हान आहे.

"जगात इ. स. 2019 मध्ये एकूण 70 कोटी वृद्ध लोक राहत आहेत . याचाच अर्थ म्हणजे आज वृध्दांची संख्या 10 टक्के आहे. इ. स. 2050 मध्ये जगात एकूण 150 कोटी वृद्ध असतील." "2011 च्या जनगणनेनुसार भारतामध्ये 10 कोटी ज्येष्ठ–वृध्द (60 वर्शावरील) जनता आहे, तर सध्या देशामध्ये 12 कोटी वृध्द असून पुढील 15 वर्शात म्हणजेच 2030 मध्ये ही संख्या 30 कोटीच्या घरात जाणार आहे." आज आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानाने अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने वृध्दत्व ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या वृध्दांची सुश्रुशा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज कुटुंबासमोर निर्माण झाला आहे. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाद होऊन वृध्दांना वाईट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांच बरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच त्यांना एकलकोंडे जिवन जगावे लागत आहे किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. "इ. स. 1950 मध्ये भारतात मनुष्याचे आयुर्मान हे 41 वर्श होते. 1990 मध्ये ते 62 वर्षापर्यत वाढलेले असून इ.स. 2021 मध्ये 70 वर्षापर्यत जाईल. सध्या जगातील एकूण 20 देशातील मनुष्याचे आयुर्मान हे 72 वर्ष आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील वृध्दांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या 20 टक्क्यांपर्यत वाढलेली आहे." त्यामुळे वृध्दांचा प्रश्न, त्यांच्या समस्या गंभीर होत आहेत. त्या सोडविण्याकडे लक्ष जावे आणि वृध्दांचे आयुश्य आनंदमय चौतन्यमय व्हावे यासाठी प्रत्येक राष्ट्राने, त्या दिशेने कार्य करण्याची गरज आहे. वयोवर्धन (Aging) ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस जन्मल्यापासून वार्धक्याच्या दिशेने वाटचाल करतच असतो. परंतु "ज्यावेळी जगातील लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढू लागले त्यावेळेला या प्रश्नाची दखल राज्यकर्त्यांनी विषेशतः नियोजन मंडळाने आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी घेतली. वयोवर्धन हा काही केवळ सामाजिक प्रश्न नाही, तर आजच्या राज्यकर्त्यांपुढे असणारे ते एक मोठेच आव्हान आहे. "म्हणून आज वृध्दांकडे लक्ष देण्याची गरज आहे. "वयोवर्धन हा केवळ संख्याशास्त्राचा विशय नाही, तो आपल्या संस्कृतीशी संबंधित आहे. इतकेच नव्हे तर हा विषय भारताच्या विकासाचीही प्रत्यक्षपणे जोडलेला आहे. प्रत्येक समाजामध्ये त्या समाजातील ज्येष्ठांना कसे वागविले जाते, हे त्या त्या समाजाची सांस्कृतिक पातळी दाखविणारे महत्वाचे गमक आहे." एकूण विचार करता असे दिसते की, "कोणताही ज्येष्ठ माणूस त्याला जर आर्थिक संरक्षण नसेल किंवा त्याला समाजात सामावून घेतले जात नसेल तर अशी ज्येष्ठ माणसे एकटी पडतात आणि त्यांचे आयुष्य म्हणजे केवळ एक हेतुहीन अस्तित्व, केवळ वनस्पतीसम जीवन किंवा एक प्रकारे ते त्यांचे सामाजिक मरणच होते. जशी वर्षे जातात, तसतसे आपले सहकारी, सहयोगी काळाच्या पडद्याआड जातात. सामाजिक संबंध तुटत जातात, आपल्या सुखदुःखाची वाटणी करायला किंवा सुखदुःखाच्या चार गोष्टी बोलायला कोणी उरत नाही. आणि अशा वेळी ही ज्येष्ठ माणसे स्वतःला घरावरचा किंवा समाजावरचा आपण बोजा आहोत असे मानू लागतात. त्यांना वाटते की, आपला समाजाला कुठलाच उपयोग नाही, आपण मरत नाही म्हणून जगतो आहोत, एक प्रकारचे परावलंबी, घरावरचे व समाजावरचे ओझे होऊन जीवन जगतो आहोत." याच्या उलट आज वाढते आयुर्मान किंवा दीर्घायुपणा ही मानव जातीच्या दृटीने एक प्रचंड महत्वाच्या विजयाची निशाणी आहे. "वाढते तंत्रज्ञान, वौद्यकीय संशोधनाने घेतलेली झेप, नवनव्या औशधांचे शोध, त्यामुळे वयोवर्धन आणि दीर्घायुपणा ही या नव्या युगाची एक नांदीच आहे. पण वाढलेल्या या वयाचा उपयोग समाजाला होतो का? या दृष्टीने ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे सारे जग आता बघत

आहे. या मनुष्यबळाचा समाजविकासाच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल किंवा अनुभवाच्या या प्रचंड खजिन्याचा समाजाच्या सुखासाठी कसा उपयोग करून घेता येईल? आपण आपल्या जीवनात केवळ वर्षे वाढवतो, का त्या वाढलेल्या वर्षांना जीवनाची चेतना देतो ? असा विचार आज जगभर सुरु झाला आहे" या दृष्टीने वयोवर्धनाचे आव्हान समाजाला कसे स्विकारता येईल, ज्येष्ठांचा सामाजिक सहभाग कसा वाढेल आणि त्यांचे आयुष्य सुखद कसे होईल याचा विचार केला जात आहे.

आधुनिक भारतातील 'वृध्दांची समस्या' ही एक ज्वलंत समस्या आहे. "भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचा होत आलेला ऱ्हास आणि अर्थव्यवस्थेतील परिवर्तनातून ही एक नविन समस्या निर्माण झाली. या समस्येची तिव्रता भारतासोबतच चिनसारख्या देशालाही जाणवत आहे. नवीन नवीन उपाययोजना वृध्दांसाठी योजण्याचा कार्यक्रम सुरुवात झालेला आहे. वृध्दांचा प्रश्न प्राचीन काळात नव्हता, कारण वृध्द हे वय कुटुंबाचे संरक्षण करीत होते. भारतात एकोणीसाव्या शतकापर्यंत वृध्दांसंबधी कोणताही प्रश्न नव्हता परंतु 21व्या शतकात मात्र वृध्दांच्या समस्येसंबंधी, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके, त्रैमासिके इत्यादीत वृध्दांच्या समस्या मांडल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचे विवेचन होत आहे. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, डेन्मार्क, रशिया इत्यादी देशात वृध्दांची समस्या अनेक शतकांपासून आजतागायत अस्तित्वात आहे. म्हणून त्या देशात वृध्दाश्रम, वृध्दत्व वेतन, वृध्द सहाय्यता इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात. वृध्दांची समस्या आता केवळ एकाच देशाची नसून ही एक जागतिक समस्या निर्माण झालेली आहे." म्हणूनच या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

वृध्दांच्या समस्येचे जागतिक स्वरुप लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 1999 हे आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ लोकांचे वर्ष म्हणून घोषित केले होते. लोकांचे लक्ष ह्या समस्येकडे वेधले जाऊन त्या संदर्भात निश्चित योजनांची आखणी व कार्यान्विकारण व्हावे असा उद्देश त्यामागे होता. "भारतात ज्येष्ठ लोकांचा प्रश्न शहर महानगरात प्रकर्शाने दिसतो. परंतु आता ग्रामीण समुदायातही ह्या समस्येचे गांभीर्य वाढलेले आहे. एकट्या ज्येष्ठ व्यक्तींचा प्रश्न ग्रामीण क्षेत्रात प्रत्ययास येत नाही. मात्र शहरी समुदायात एकट्या वृध्दांचा प्रश्न जटिल झाला आहे." यामुळे वृध्दांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

प्राचीन भारतीय समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती. तरुण व्यक्तीला प्रसंगानुरुप उपदेश व मार्गदर्शन वृध्द व्यक्तीलाच करावे लागत असे. त्यामुळेच कुटुंबाला वृध्दांचा आणि वृध्दांना कुटुंबाचा आधार होता. तरुण पिढी अर्थार्जनाचे काम करत असल्यामुळे वृध्दांच्या मार्गदर्शनाचा, अनुभवाचा, उपदेशाचा उपयोग या तरुण पिढीला होत असे. परंतु आज जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकरण व तसेच नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबपध्दतीत अमुलाग्र बदल होऊन विभक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. विभक्त कुटुंबात पती–पत्नी व त्यांची अविवाहित मुले राहत असल्याने वृध्दांची त्यांना अडचण वाटु लागली आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे वय किंवा वृध्द या घटकांपेक्षा गुणवत्ता पात्रता आणि प्राविण्यता यांना महत्व प्राप्त झाले त्यामुळे वृध्दांचे महत्व, कमी होऊन त्यांच्यावर वृध्दाश्रमात राहण्याची वेळ येत आहे.

**वृध्दाश्रम म्हणजे काय** :–"वृध्दाश्रम हे अशा प्रकारचे रहिवाशी केंद्र असते की ज्यामध्ये 60 वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या किमान 25 व्यक्तींची सोय केली जाते. निवाऱ्याची गरज असणाऱ्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील वृध्द व्यक्तींनाही वृध्दाश्रमात प्रवेश दिला जातो."

**संशोधनाची उद्दिष्टे** : 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांच्या वौयक्तिक स्थितीचा अभ्यास करणे. 2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती जाणून घेणे.

**गृहितकृत्ये**:– 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती वाईट आहे. 2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांना सामाजिक समस्या भेडसावतात.

**संशोधनाचे अध्ययन क्षेत्र** : प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग एवढेच मर्यादीत करण्यात आलेले आहे.

**संशोधन आराखडा** : प्रस्तुत संशोधनामध्ये **'वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा'** अवलंब करण्यात आला आहे.

**नमुना निवड पध्दती** : मराठवाडा विभागात सद्यस्थितीत सुरू असलेल्या एकूण दहा वृध्दाश्रमांमध्ये राहणाऱ्या एकूण 400 वृध्दांपौकी 50 टक्के म्हणजेच 200 उत्तरदात्यांची **'सहेतुक नमुना निवड पध्दतीचा'** वापर करून संशोधनासाठी नमुना म्हणून निवड केलेली असून हे तथ्य संकलन ऑक्टोबर ते डिसेंबर 2014 मध्ये करण्यात आलेले आहे.

**तथ्य संकलनाच्या पध्दती**

**1) प्राथमिक स्त्रोत** : प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासकार्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये **'मुलाखत अनुसूची'** या साधनांचा उपयोग केला आहे.

**2) दुय्यम स्त्रोत** : दुय्यम स्त्रोतांमध्ये संशोधन विशयाच्या अनुशंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखान, वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके, वेगवेगळे अहवाल, इंटरनेट इत्यादी उपलब्ध स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची वयौक्तिक व सामाजिक स्थिती कशी आहे हे शोधण्याचा प्रयत्न केलेला असून हे पुढील माहितीवरून अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती**

(एकूण 200 उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर – डिसेंबर 2014.)

| तक्त्यांचे क्र. | तक्त्यांचे | पर्याय | वृध्दांची | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1.1 | वृध्द उत्तरदात्यांचा वयोगट | 60–69 वर्ष | 51 | 25.50 |
| | | 70–79 वर्ष | | 7939.50 |
| | | 80–89 वर्ष | 58 | 29.00 |
| | | 90 पेक्षा जास्त वर्ष | 12 | 06.00 |
| 1.2 | वृध्द उत्तरदात्यांचे लिंग | स्त्री | 111 | 55.50 |
| | | पुरुष | 89 | 44.50 |
| 1.3 | वृध्द उत्तरदात्यांचे शिक्षण | अशिक्षित | 94 | 47.00 |
| | | प्राथमिक | 51 | 25.50 |
| | | माध्यमिक | 37 | 18.50 |
| | | उच्च माध्यमिक | 06 | 03.00 |
| | | पदवी | 06 | 03.00 |
| | | पदव्यूत्तर | 04 | 02.00 |
| | | प्रौढ शिक्षित | 02 | 01.00 |
| 1.4 | वृध्द उत्तरदात्यांचा वौवाहिक दर्जा | अविवाहित | 08 | 04.00 |
| | | विवाहित | 50 | 25.00 |
| | | विधवा | 94 | 47.00 |
| | | विधुर | 47 | 23.50 |
| | | घटस्फोटित | 01 | 00.50 |
| 1.5 | व□ध्द उत्तरदात्यांचा जात प्रवर्ग | खुला | 119 | 59.50 |
| | | अनुसूचित जाती | 21 | 10.50 |
| | | इतर मागास प्रवर्ग | 36 | 18.00 |
| | | भटक्याविमुक्त जाती / जमाती | 22 | 11.00 |
| | | विषेश मागास प्रवर्ग | 02 | 01.00 |
| 1.6 | व□ध्द उत्तरदात्यांचा धर्म | हिन्दु | 169 | 84.50 |
| | | बौध्द | 13 | 06.50 |
| | | जौन | 09 | 04.50 |
| | | षिख | 08 | 04.00 |
| | | ख्रिष्चन | 01 | 00.50 |
| | | **एकूण** | **200** | **100.00** |

सदरील तक्ता क्र. 1.1 वरुन असे दिसते की, '60 ते 69 वर्षे' या 'तरुण वृध्द' (Young Old) वयोगटातील 25.50 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर '70 ते 79 वर्ष' या 'मध्यम वृध्द' (Middel Old) वयोगटातील 39.50 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर '80 ते 89 वर्षे' या 'वृध्द–वृध्द' (Old & Old) वयोगटातील 29 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर 90 व त्यापेक्षा जास्त वर्षे' या 'अतिशय वृध्द' (Oldest Old) वयोगटातील 06 टक्के वृध्द उत्तरदाते असलेले दिसून येतात. यावरून आपणास असे म्हणता येईल की वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधने, शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना यामुळे आज जन्मदरात व मृत्युदरात घट होत असल्यामुळे आज व्यक्तीची आयुर्मयादा दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे आणि ती येत्या काळात सतत वाढतच राहणार आहे हे आपल्याला वरीलप्रमाणे दिसून येते. तसेच तक्ता क्र. 1.2 चा विचार करता असे दिसते की, 55.50 टक्के 'स्त्री' उत्तरदात्या असून 44.50 टक्के उत्तरदाते 'पुरुष' असलेले दिसून येतात. म्हणजेच वृध्दाश्रमात राहणाऱ्या एकूण वृध्दांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. तर तक्ता क्र. 1.3 चा विचार करता असे स्पष्ट होते की, अशिक्षित 47 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण प्राथमिक 25.50 टक्के, माध्यमिक 18. 50 टक्के, उच्च माध्यमिक व पदवी अनुक्रमे 3 टक्के, पदव्यूत्तर 2 टक्के आणि प्रौढ शिक्षित 1 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरून असे म्हणता येते की, जसजसा शिक्षणाचा स्तर उंचावत जातो तसतसे वृध्दामधील शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. तर तक्ता क्र. 1.4 वरुन असे दिसते की, 'अविवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण 04 टक्के एवढे आहे. तर 'विवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण 25 टक्के एवढे आहे, तर 70.50 टक्के वृध्द उत्तरदात्यांच्या जोडीदारांचा मृत्यू झालेला असून त्यामध्ये 47 टक्के 'विधवा' असून 23.50 टक्के विधुर असलेले दिसतात, तर 1 वृध्द उत्तरदाता घटस्फोटित आढळला असून त्याचे एकूण उत्तरदात्यांशी शेकडा प्रमाण 0.50 टक्के इतके आहे. वरील तक्त्याचा विचार करता असे दिसते की, 'विवाहित' वृध्द उत्तरदाते 96 टक्के असून हे प्रमाण 'अविवाहित' 04 टक्के उत्तरदात्यापेक्षा अधिक आहे. यावरुन आपणास असे दिसते की, भारतीय समाजामध्ये विवाह करणे अनिवार्य मानलेले आहे. यावरून आपणास विवाहाची अनिवार्यता हे भारतीय समाजाचे वौशिष्टय स्पष्ट होते. तसेच तक्ता क्र. 1.5 वरून असे दिसते की, 'खुल्या' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 59.50 टक्के आहे, तर 'अनुसूचित जाती' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 10.50 टक्के आहे, तर 'इतर मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 18 टक्के एवढे आहे, तर 'भटक्या विमुक्त जाती जमाती' या प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 11 टक्के एवढे आहे तर 'विषेश मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 01 टक्का एवढे असून 'अनुसूचित जमाती' या प्रवर्गातील एकही उत्तरदाता वृध्दाश्रमात राहत असलेला आढळला नाही. तसेच तक्ता क्र. 1.6 चा विचार करता असे दिसते की, 'हिंदू' या धर्मातील सर्वाधिक म्हणजेच 84.50 टक्के वृध्द उत्तरदाते असून हे प्रमाण 'बौध्द' 06.50 टक्के, जैन 04.50 टक्के, सिख 04.00 टक्के व ख्रिश्चन 0.50 टक्के या सर्व धर्मातील उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. हे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे मराठवाड्याात 'हिंदू' धर्मीयांची लोकसंख्या सर्वाधिक असल्यामुळे वृध्दाश्रमात राहण्याचे प्रमाणही 'हिंदू' धर्मीयांमध्ये अधिक असणे साहजिकच आहे.

**तक्ता क्र. 2 वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांची सामाजिक स्थिती**

(एकूण 200 उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर – डिसेंबर 2014.)

| तक्त्यांचे क्र. | तक्त्यांचे शिर्शक | पर्याय | वृध्दांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 2.1 | **वृध्द उत्तरदात्यांची मित्रमंडळी कोण आहेत.** | समान आवड असणारे | 127 | 63.50 |
| | | एकाच खोलीत राहणारे | 59 | 29.50 |
| | | सम व्यावसायिक | 07 | 3.50 |
| | | कोणीच नाही | 07 | 3.50 |
| 2.2 | **वृध्द उत्तरदात्यांना मित्रमंडळीकडून काय अपेक्षित आहे.** | सुख दुःखात सहभागी व्हाव | 59 | 29.5 |
| | | आपले दुःख यातना, | 90 | 45.00 |
| | | समस्या जाणून घ्याव्यात | 90 | 45.00 |
| | | वेळोवेळी मदत | 43 | 21.50 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सुख दुःखात सहभागी व्हावं + आपले दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात | 100. | 50 |
| | | कोणीच मित्रमंडळी नसल्यामुळे लागू नाही | 7 | 3.50 |
| 2.3 | वृध्दाश्रमामध्ये अपमानास्पद वागणूक मिळते असे वाटते का. | होय | 155 | 77.50 |
| | | नाही | 45 | 22.50 |
| 2.4 | वृध्दाश्रमातील मित्र सुख दु. सहभागी होतात का | होय | 133 | 66.50 |
| | | नाही | 67 | 33.50 |
| 2.5 | वृध्दाश्रमात तब्बेतीची कोण काळजी घेते | जोडीदार | 19 | 09.50 |
| | | कर्मचारी | 20 | 10.00 |
| | | मित्र | 63 | 31.50 |
| | | मुलगी | 1 | 00.50 |
| | | कोणीच नाही | 97 | 48.50 |
| 2.6 | वृध्दाश्रमातील वृध्दांसोबत डॉक्टर योग्य पध्दतीने | होय | 98 | 49.00 |
| | | नाही | 102 | 51.00 |
| | डॉक्टर योग्य पध्दतीने | होय | 98 | 49.00 |
| | | नाही | 102 | 51.00 |
| 2.7 | प्रकृती चांगली रहावी यासाठी योग्य ती काळजी घेतली जाते का. | होय | 40 | 20.00 |
| | | नाही | 160 | 80.00 |
| 2.8 | आवडीचे व पाचक अन्न दिले जाते का. | होय | 12 | 06.00 |
| | | नाही | 188 | 94.00 |
| 2.9 | कुटुंबातील सदस्य उत्तरदा कोण कोणत्या सण समालग्न घरी घेउन जातात. | दिवाळी | 8 | 04.00 |
| | | समारंभ | 13 | 06.50 |
| | | वाढदिवस | 4 | 02.00 |
| | | दिवाळी + लग्न समारंभ5 | 02. | 50 |
| | | घेउन जात नाहीत | 119 | 59.50 |
| | | कुटुंबच नसल्यामुळे लागू नाही | 51 | 25.50 |
| 2.10 | वृध्दांना कोणकोणत्या सामाजिक समस्या भेडसावत आहेत | समाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते | 67 | 33.50 |
| | | एकाकीपणात वाढ | 80 | 40.00 |
| | | मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते. | 32 | 16.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कर्जबाजारीपणात वाढ | 2 | 01.00 |
| | | न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे | 10 | 05.00 |
| | | मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते + न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे | 1 | 00.50 |
| | | एकाकीपणातवाढ + 3 न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे | 01.50 | |
| | | समाजिक मानसन्मान कमी झ्ााला असे वाटते + एकाकीपणात वाढ | 3 | 01.50 |
| | | वोणतीच नाही | 2 | 01.00 |
| 2.11 | **वृध्दाश्रमात असलेल्या करमणूकीच्या साधनांचा वापर करण्याची वृध्दांना परवानगी आहे का.** | होय | 70 | 35.00 |
| | | नाही | 75 | 37.50 |
| | | लागु नाही | 55 | 27.50 |
| 2.12 | **वृध्दाश्रमातीलकर्मचाऱ्यांसोबत वृध्दांचे संबंध कसे आहेत.** | प्रेम | 15 | 07.50 |
| | | तिरस्कार | 135 | 67.50 |
| 2.13 | **कर्मचारी वृध्दांबरोबर उपकार केल्यासारखे वागतात का.** | होय | 187 | 93.50 |
| | | नाही | 13 | 6.50 |
| 2.14 | **वृध्दाश्रमात वृध्दांच्या सर्व गरजा भागविल्या जातात का.** | होय | 23 | 11.50 |
| | | नाही | 177 | 88.50 |
| 2.15 | **वृध्दाश्रमातील व्यवस्थापना कडून वृध्दांच्या तकारीचे निवारण केले जाते का** | होय | 20 | 10.00 |
| | | नाही | 180 | 90.00 |
| | **एकूण** | | **200** | **100.00** |

वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती अभ्यासत असतांना सदरील तक्ता क्र. 2.1 वरून असे दिसते की, समान आवड असणारे आमचे मित्र आहेत असे उत्तर देणारे 63.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण एकाच खोलीत राहणारे 29.50 टक्के, समव्यावसायिक 3.50 टक्के आणि आमचे कोणीच मित्र नाहीत असे उत्तर देणाऱ्या 3.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा आधिक आहे. तसेच वरील तक्ता क्र. 2.2 वरून असे स्पश्ट होते की, आमच्या मित्रांनी आमच्या दु:ख यातना, समस्या जाणून घ्याव्यात असे अपेक्षित आहे असे उत्तर देणारे 45 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण मित्रांनी आमच्या सुख दु:खात सहभागी व्हावं 29.50 टक्के, वेळोवेळी मदत करावी 21.50 टक्के, सुख दु:खात सहभागी व्हावं + आपले दु:ख यातना, समस्या जाणून घ्याव्यात 0.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.3 वरून असे स्पष्ट होते की, आम्हाला वृध्दाश्रमात राहत असतांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे असे वाटते असे उत्तर देणारे 77. 50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला वृध्दाश्रमात अपमानास्पद वागणूक मिळत नाही असे उत्तर देणाऱ्या 22.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. वरून असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमात सुध्दा वृध्दांना कुटुंबाप्रमाणेच अपमानास्पद वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. तसेच तक्ता क्र. 2.4 वरून असे दिसते की, वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दु:खात सहभागी होतात असे उत्तर देणारे 66.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दु:खात सहभागी होत नाहीत असे उत्तर देणाऱ्या 33.50 टक्के

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

उत्तरदात्यांच्या प्रमाणात आधिक आहे. वरून असे दिसते की वृध्दाश्रमातील सर्व वृध्दांचे सुख दुःखात जवळपास सारखेच असल्यामुळे ते एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होतात. तसेच तक्ता क्र. 2.5 वरुन असे दिसते की, वृध्दाश्रमात राहत असतांना आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे 48.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या तब्बेतीची काळजी आमचा जोडीदार घेतो असे उत्तर देणाऱ्या 9.50 टक्के, तब्बेतीची काळजी कर्मचारी घेतात असे उत्तर देणाऱ्या 10 टक्के, मित्र काळजी घेतात असे उत्तर देणाऱ्या 31.50 टक्के आणि मुलगी काळजी घेते असे उत्तर देणाऱ्या 0.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.6 वरुन असे दिसते की, आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलत नाहीत असे उत्तर देणारे 51 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलतात असे उत्तर देणाऱ्या 49 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. वरून असे स्पश्ट होते की वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांसोबत डॉक्टरसुध्दा योग्य पध्दतीने बोलत नाहीत. तसेच तक्ता क्र. 2.7 वरुन असे दिसते की, आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जात नाही असे उत्तर देणारे 80 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जाते असे उत्तर देणाऱ्या 20 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. या वरुन आपणास असे म्हणता येईल की वृध्दाश्रमात वृध्दांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेतली जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.8 वरुन असे दिसते की, वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही असे उत्तर देणारे 94 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जाते असे उत्तर देणाऱ्या 6 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असा निष्कर्श निघतो की, वृध्दाश्रमात वृध्दांना त्यांच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.9 वरुन असे दिसते की, आमच्या कुटुंबातील सदस्य आम्हाला कोणत्याच सण समारंभाला घरी घेवून जात नाहीत असे उत्तर देणारे 59.50 उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला आमचे कुटुंबिय दिवाळीला घरी घवून जातात असे उत्तर देणारे 4 टक्के, लग्न समारंभाला घेवून जातात असे उत्तर देणारे 6.50 टक्के, वाढदिवसाला घेवून जातात असे उत्तर देणारे 2 टक्के, दिवाळी व लग्न समारंभाला घरी घेवून जातात असे उत्तर देणाऱ्या 2.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमात राहत असणाऱ्या वृध्दांना सण समारंभाला सुध्दा घरी नेले जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.10 यावरुन असे स्पष्ट होते की, वृध्दत्वामुळे एकाकीपणात वाढ झाली आहे असे आम्हाला वाटते असे उत्तर देणारे 40 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण सामाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते असे उत्तर देणारे 33.50 टक्के, मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते असे उत्तर देणारे 16 टक्के, कर्जबाजारीपणात वाढ होत आहे असे उत्तर देणारे 1 टक्का, न्यूनगंडाची भावना प्रबळ बनत आहे असे उत्तर देणारे 5 टक्के, मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते व न्यूनगंडाची भावना प्रबळ बनत आहे असे उत्तर देणारे 0.50 टक्के, एकाकीपणात वाढ व न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे आणि सामाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते व एकाकीपणात वाढ या सामाजिक समस्या भेडसावत आहेत असे म्हणणारे प्रत्येकी 1.50 टक्के तर आम्हाला कोणतीच सामाजिक समस्या भेडसावत नाही असे उत्तर देणाऱ्या 1 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरुन आपणास असे म्हणता येते की वार्धक्यात व्यक्तीला कोणत्याना कोणत्या सामाजिक समस्या भेडसावत असतात आणि धावपळीच्या जीवनामुळे त्यांच्यामध्ये एकाकीपणात वाढ होत आहे. तसेच तक्ता क्र. 2.11 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमामध्ये असलेल्या करमणूकीच्या साधनांचा आम्हाला वापर करण्याची परवानगी नाही असे उत्तर देणारे 37.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला परवानगी आहे असे उत्तर देणाऱ्या 35 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.12 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे तिरस्काराचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 67.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे प्रेमाचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 7.50 टक्के, आपुलकीचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 8 टक्के, रागाचे संबंध आहेत असे उत्तर देणाऱ्या 17 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.13 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमातील कर्मचारी आमच्याबरोबर उपकार केल्यासारखे वागतात असे उत्तर देणारे 93.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण कर्मचारी उपकार केल्यासारखे वागत नाहीत असे उत्तर देणाऱ्या 6.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे म्हणता येते की वृध्दाश्रमामध्ये सुध्दा वृध्दांना कर्मचाऱ्यांकडून दुय्यम वागणूक मिळत असलेली दिसते. तसेच तक्ता क्र. 2.14 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमामध्ये आमच्या सर्व गरजा भागविल्या जात नाहीत असे उत्तर देणारे 88.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या सर्व गरजा भागविल्या जातात असे उत्तर देणाऱ्या 11.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमामध्ये सुध्दा वृध्दांच्या सर्व गरजांची पुर्तता होत नसलेली दिसते. तसेच तक्ता क्र. 2.15 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रम व्यवस्थापनाकडून आमच्या तक्रारींचे निवारण केले जात नाही असे उत्तर देणारे 90 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या तक्रारींचे निवारण केले जाते असे उत्तर देणाऱ्या 10 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दांच्या तक्रारींची वृध्दाश्रमांमध्ये सुध्दा दखल घेतली जात नसून त्यांना कुटुंबाप्रमाणेच दुय्यम वागणूक दिली जाते.

**निष्कर्षः—**

1. वृध्दाश्रमात राहणाऱ्यावृध्दांमध्ये 70—79 वर्षे या मध्यम वृध्द (Middle Age) वयोगटातील उत्तरदाते सर्वाधिक म्हणजेच 39. 50 टक्के आहेत.
2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये स्त्री वृध्दांचे प्रमाण अधिक म्हणजेच 55.50 टक्के एवढे आहे.
3. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये हिंदू धर्मियांचे व खुल्या प्रवर्गातील उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे.
4. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये विवाहित उत्तरदात्यांचे प्रमाण 96 टक्के असून त्यामध्ये विधवांचे प्रमाण अधिक (47 टक्के) आहे.
5. वृध्दाश्रमात राहणाऱ्यावृध्दांमध्ये अशिक्षित वृध्दांचे प्रमाण अधिक आहे.
6. समान आवड असणारे आमचे मित्र आहेत असे उत्तर देणारे सर्वाधिक 63.50 टक्के उत्तरदाते आहेत.
7. आमच्या मित्रांनी आमच्या दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात असे अपेक्षित आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
8. आम्हाला वृध्दाश्रमात राहत असतांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे असे वाटते असे उत्तर देणारे सर्वाधिक 77.50 टक्के उत्तरदाते आहेत.
9. वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दुःखात सहभागी होतात असे उत्तर देणारे सर्वाधिक 66.50 टक्के उत्तरदाते आहेत.
10. वृध्दाश्रमात राहत असतांना आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
11. आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलत नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक 51 टक्के उत्तरदाते आहेत.
12. आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जात नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक 80 टक्के उत्तरदाते आहेत.
13. वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक 94 टक्के उत्तरदाते आहेत.
14. आमच्या कुटुंबातील सदस्य आम्हाला कोणत्याच सण समारंभाला घरी घेवून जात नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक 59.50 उत्तरदाते आहेत.
15. वार्धक्यात व्यक्तीला कोणत्याना कोणत्या सामाजिक समस्या भेडसावत असतात आणि धावपळीच्या जीवनामुळे त्यांच्या एकाकीपणात वाढ होत आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
16. वृध्दाश्रमामध्ये असलेल्या करमणूकीच्या साधनांचा आम्हाला वापर करण्याची परवानगी नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
17. वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे तिरस्काराचे संबंध आहेत असे उत्तर देणारे सर्वाधिक 67.50 टक्के उत्तरदाते आहेत.
18. वृध्दाश्रमातील कर्मचारी आमच्याबरोबर उपकार केल्यासारखे वागतात असे उत्तर देणारे 93.50 टक्के उत्तरदाते आहेत.
19. वृध्दाश्रमामध्ये आमच्या सर्व गरजा भागविल्या जात नाहीत असे उत्तर देणारे 88.50 टक्के उत्तरदाते आहेत.
20. वृध्दाश्रम व्यवस्थापनाकडून आमच्या तक्रारींचे निवारण केले जात नाही असे उत्तर देणारे 90 टक्के उत्तरदाते आहेत.

अशा प्रकारे प्रस्तुत शोधनिबंधातून वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

***संदर्भग्रंथ सूची :***


1. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 45.*
2. *खडसे भा. कि., (2004), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ क्र. 146.*
3. United Nations, Department of Economic and Social Affairs Population Division, (2019), 'World Population Ageing 2019 Highlights', New York, United Nations, i`- Ø- 05-
4. *महराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद, सोमवार, दिनांक, 13 जुलौ 2015, पृ क्र. 05.*
5. *लिमकर सुधाकर, (2005), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाषन, पृ क्र. 61.*
6. *गोखले शरच्चंद्र, (2012), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 05.*
7. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 04.*
8. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 04—05.*
9. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. 05—06.*
10. *गंदेवार एस.एन., (2004), भारतीय समाजः वादातीत विषय आणि समस्या, लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ क्र. 133.*
11. *खडसे भा. कि., (2004), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ क्र. 144.*
12. *सांगोलकर दत्ता (2014), 'मानवी हक्क', पुणे, जिज्ञासा प्रकाशन. पृ क्र. 157.*